... मग्रहालय, ठाणे

निबंध -७० - सन १८९९

शामराव मोरोजी

श्रीमन् सभा विजय

( श्री प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, ठाणे )

श्रीमंत् सभा विजय.

म. ग्रं. मं. ठाणें
ग्र निबंध
नं. ७५५
मराठी ग्रंथ संग्रहालय
नं०
ठाणें

श्री

# श्रीमत्सभाविजय.

नामकविजयपद्ग्रंथ.

आपल्याज्ञातीच्याउत्पत्तीविषयींमागेंझालाआहे,

तोयेथेंमींप्रसिद्धकरितों.

शामरावमोरोजी.

मुंबई.

शके १७८८

१८६६

त्याग्रंथाच्या ४०० प्रतिप्रसिद्धकेल्याआहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं० ८८९
ठाणें सन १८०
८८६६

श्रीहरि

चरणीं

हें अक्षयलेणें

रहो

अंक २

॥श्लोक॥

॥यतःसत्यंततोधर्मोयतोधर्मस्ततोहरिः॥
॥ यतोहरिस्ततोलक्ष्मीर्यतोलक्ष्मीस्ततोजयः॥

सत्यस्वरूपीअसाजोश्रीहरि,
त्यास
मीमणामादि करून,
त्याचेच
प्रेरणेनेंहालाहानसा
ग्रंथ
करण्यास आरंभ
केलाआहे,

॥मिती रघुतिलकजयंति
शके१७८७

कर्त्ता.

## ॥ अनुक्रमणिका ॥


प्रस्तावना · ५
संस्कृतग्रंथाचाउपयोग · ·
" आर्ष " ग्रंथवर्णन · ७
" पौरुषेय " ग्रंथवर्णन · ·
" संस्कृत ग्रंथ गंगार्पण · ८
" जेव्हांइंग्लिशनवेग्रंथ हिंदूचेपुराणवइतिहासा वरूनकरितात, व त्यांत शास्त्रीपंडितांचेसांगि तरून कसेनेमनाधारये तात तेंवर्णन · ·
इंग्लिशनवेचारग्रंथ ९
१ डबल्यू · वार्डस् हिंदू मैथोलोजि · १०
यावरसमाधान ·
२ व्हान्स् · किनडीस् मराठी डिक्सनरि · ११
यावरसमाधान १२
३ जेम्स् · टी · मोलस् वर्थ मराठी डिक्सनरि · १२
यावरप्रथमसमाधान · १४
यावरद्वितीयसमाधान · २०
यावर तृतीयसमाधान · २५
४ एच · एच · उल्स नस् इंग्लिश ग्लोसरी २८
यावरसमाधान · २९
शेवटींश्रीशंकरस्वामींनीं प्रभूंस उपदेशकेला आ णि " आज्ञापत्र " हा तीदिलें, तेंनिरूपण · ३१
नंतर स्वज्ञानीसग्रंथक र्त्यांची विज्ञप्ति · ३२


अनुक्रमणिकासमाप्ता

# ॥ प्रस्तावना ॥

श्रीहरीच्या कृपेनें मागें दोनतीन ग्रंथ माझ्या हातून प्रभूविषयीं झाले असतां, हा ग्रंथ करण्याचें कारण इतकेंच कीं, जे तरुण हिंदु इंग्लिश विद्याभ्यास करणारे पुढें होतील, त्यांस अभ्यासा करितां मराठी आणि इंग्लिशभाषांचे कोश वगैरे जे हल्लीं झालेले आहेत, ते वाचावे लागतील, आणि त्यानंतर आपल्या ज्ञाती विषयीं बुद्धिपूर्वक जे द्वेषभावानें खोटे निर्णयांनीं उत्पत्तीचे प्रकार लिहिलेले आहेत, ते त्यांस सांपडल्यावर जो त्यांत विपरीतार्थ आहे, तो खरा असें ते समजतील, तसें न व्हावें ह्मणून त्या कोशांच्या स्पष्ट उघड अर्थ करण्या करितां, त्यांतील सर्व निर्णयांची एकवाक्यता करून हा सूक्ष्म विचाराचा लाहानसा ग्रंथ करावा, असें मनांत आणून हा उद्योग चालविला आहे.

आतां पाहिलें असतां त्या ग्रंथकारांपेक्षां माझी अल्पमतीची योग्यता, व शोध किती याचें तारतम्य पाहिलें तर, त्यांत अंतर फारच आहे, तथापि ग्रंथ करण्यास ज्यापेक्षां प्रवृत्त झालों, त्यापेक्षां मला जें अल्प स्वल्प व वास्तविक असें वाटतें, तें अवश्य लिहिणें प्राप्त झालें, ह्म

न लिहिलें आहे, व नें सांगितले व इतर ग्रंथा धाराव
न हें मी लाहानसें पुस्तक केलें आहे, कारणकीं आर्या·
धुनेजेसाउदधीशोधेनेसादिसेप्रभूउगमें ॥
इनिपाहातां पाहातां आदळलामन्मनीसलिपिनि॥
म ॥ १ ॥

म्हणून इतकाउ योग केला, आणि मीच कायतो एक
थकर्ता व ज्ञाता आहें, असाजो अभिमान तोसोडूनउ
त्या ग्रंथकारांस माझी विनयपूर्वक मित्रभावें व विचार
सि आहे·

यास्तव हा ग्रंथ केल्यावर, महान् महान् विद्वान् आ
हुत ग्रंथ पाहाणारे शोधक, असे संस्कृत, मराठी
इंग्लिश भाषा पूर्ण ज्ञाते, यांस हा ग्रंथ आदीं दाखव
व त्यांचे या स्वसंमत, आणि साह्यता घेतली आहे·

द २ सागर ३ उत्पत्ती ४ वेद·



॥ श्री ॥

## ॥ श्रीमत्सभाविजय ॥

॥श्रीगणेशायनमः॥ हाग्रंथलिहिण्यापूर्वीं, हिंदूच्या संस्कृत व मराठी भाषेत, अशासर्व ग्रंथांची मुळापासून, कसीकाय व्यवस्था झाली आहे, ती लिहितों.

### ॥ संस्कृतग्रंथांचाउपयोग ॥

याहिंदुस्थानांत, हिंदूचे जितके संस्कृत ग्रंथ झाले आहेत, तितक्यांस हिंदू विद्वज्जनांनीं दोनभाग केले आहेत, तीं अशी कीं, एक "आर्ष." आणि दुसरे "पौरुषेय"

आतां "आर्ष." कोणते ह्मणाल तर, जे देवांपासून झाले, व ऋषिप्रणीत ह्मणजे ऋषींनीं केले ते; वेद श्रुति स्मृति, शास्त्र, पुराण, व वाल्मिकीरामायण इत्यादि या ग्रंथांतील सर्वविषयांवरलीं प्रमाणें, श्रीकाशी पासून सेतुबंध रामेश्वरा पर्यंत, जगद्गुर्वादि विद्वज्जन. व इतर सर्व हिंदूलोक, यांस मान्य आहेत.

आतां "पौरुषेय." ह्मणजे आली कइच्या, संहितादिकांनीं, पूर्वींच्या आर्ष ग्रंथाधारानें, व स्वबुद्धीनें.

जे केलेले कोणते तर; काव्य, नाटक, चंपू, भाण, प्रहसन, डिम, व्यायोग इत्यादि, यांत कित्येक असे आहेत कीं, नीतिपर, धर्मपर, वंशपर, ज्ञातीच्या उत्पत्तीविषयीं, व न्यायानुसारी असे होत. त्यांपासून नीति, वादजन्य, सिद्धांत इत्यादि कांचे विषय अवगत होतात, ते झालें म्हणजे, मगलोकांचा उपमर्द, अथवा स्वमताचें स्थापन, असें करितात, परंतु त्यांत "आर्ष" ग्रंथांचा स्पष्ट आधार दर्शित केल्यावांचून, त्या ग्रंथांचें प्रमाण सर्वांस मान्य होत नाहीं, असें वरच्या जगद्गुरु दिकांस, व इतरांस मान्य आहे, ह्मणून "पौरुषेय" वगैरे नास्तिकांचे जे निराधार, असंमत ग्रंथ होते, ते बहुतेक श्रीमत् शंकरस्वामींनीं, व काहीं हिंदूराजांनीं, आणि अलीकडे पेशव्यांनीं, श्री गंगेला अर्पण केलें.

आतां हे वरचे ग्रंथ, सर्वच बुडाले आहेत, असें नाहीं, त्यांतून कांहीं, लोकांच्या संग्रहास राहिले आहेत, ते पाहा; "परशुरामप्रताप, जाति विवेक, हेमाद्रि, स्मृत्यर्थसार, इत्यादि," हे जातिउत्पत्तीवर आहेत.

आतांचे राजे इंग्लिश लोक, हिंदूंचीं पुराणें, इतिहास, व शब्दकोश इत्यादि, कांवरून जे व्हांनवीन "बुकें" ह्मणजे

ग्रंथ करूं लागतात, ते ह्यां शास्त्री पंडितांस, ते नेमतात, म
गते ग्रंथाचे "प्रस्तावनेंत," उघड लिहितात कीं, "अमुक शा
स्त्री पंडितांचे साहाय्यानें, हा ग्रंथ मी केला आहे;" यांतील म
र्म इतकेंच कीं, त्या शास्त्री पंडितांस हें प्रकरण चांगलें माहीत
असतें, यास्तव ते ज्या कोणत्याही संस्कृत ग्रंथावरून अर्थ सां
गतील, तो आधार व सिद्धांत, असें ते इंग्लिश लोक सम
जतात, यावरून उघड दिसून येतें कीं, हर एक प्रकरण जित
कें हिंदूचें हिंदूंस विशेष माहीत आहे, तितकें परदेशचे इं
ग्लिश लोकांस माहीत नाहीं, तरते शास्त्री लोकांसच, कां
कीं, येथें हिंदूचे कोणते कशाविषयीं कसे प्रमाण ग्रंथ आहेत,
हा शास्त्री पंडितांचे हातीं निर्णय आहे म्हणून, अमुक ग्रंथां
चें प्रमाण घेण्यास, अमुकच ग्रंथ योग्य आहे, व अमुक नाहीं,
असें सिद्ध करितात, या लेखावरून, संस्कृत ग्रंथाचा उपयो
ग हि काय तो दिसून येतो.

॥ श्रीमत् सभा विजय ॥

तो असाकीं, आपल्या ज्ञातीच्या उत्पत्ती विषयीं, इंग्लि
शच्यार "बुकांत," म्हणजे ग्रंथांत भलतसे, विरुद्ध विषय प्रसि
द्धपणें लिहिले आहेत, त्यांचीं नावें याप्रमाणें.

१ आन्हिउ आव्हाधि हिस्टरी लिटरेचर, आन्ड मेथो

लोजि, आव्हधिहिंदू.

२ आडिक्षनरिआव्हधिमराठीलांग्वेज.

३ आडिक्षनरिमराठीआन्डइंग्लिश. आणि

४ आग्लोसरी.

॥ डबल्यू. वार्ड्स हिंदू मैथोलोजि ॥

आतां पहिली, आव्हिउआव्हधिहिस्टरी लिट्लेचर, आव्ह मैथोलोजि, आव्हधिहिंदू. " म्हणजे हिंदूलोकांना पुराणोक्त इतिहास व विज्ञान याचा हा ग्रंथ. डबल्यू. वार्ड, यांणीं दोन पुस्तकांनीं केला, तो सन १८१८ त शिरांपी रथे थें छापिला, त्याचे प्रथम पुस्तकाचे, ६६ वे पृष्ठा पंक्ति हा, असें लिहिलें आहे कीं," कित्येक पंडितांनें असें सांगितलें हिं "नकीं, ह्या कलियुगीं क्षत्रिय राहिले नाहींत, दोनच अर्प "त्र आहेत, ब्राम्हण आणि शूद्र; आतां राहिले जे दुसरे "(म्हणजे क्षत्रिय,) आणि तिसरे (म्हणजे वैश्य), ते " रण्यांत (म्हणजे शूद्र वर्णांत) मिसळले."

॥ समाधान ॥

यावर निश्चयात्मक समाधान असें आहे कीं, हिंदूंच्या इतिहासांचे जे "आर्ष" ग्रंथ, श्रीमन्महाभारत, हरिवंश, भागवत, वाल्मिकीरामायण, आणि सर्वपुरा

णें, ऋषिप्रणीत अशीं प्रसिद्ध आहेत, त्यांत कलियुगीं क्षत्रिय नसावे, असें कोठेंही आढळत नाहीं, उलटे क्षत्रियांचे अक्षय वंश आहेत, वरूनील अशीं आदिनारायणाचीं जागोजागीं, वचनें सांपडतात, असें असतां ब्राह्मण मात्र राहिले, आणि ते सर्व क्षत्रिय कसे व कध्या शूद्र वर्णांत मिसळले, असें कसें होईल, यास "आर्ष" ग्रंथांचें प्रमाण पाहिलें असतां नाहीं, म्हणून यावर अशा शतशः कोणी पोकळ प्रतिज्ञा करून उगीच सांगितल्या, तरि तितक्या हि सर्व अप्रमाण लिहिल्या, यास्तव मिथ्या आहेत मग लिहिणाऱ्यांनीं कशा लिहिल्या असें म्हणाल तर, इतका शोध कोण करितो, जें शास्त्री पंडितांनीं सांगितलें तें खरें, असें समजून त्यांनीं लिहिल्या.

॥ व्हान्स् किनडीस् मराठी डिक्षनरि. ॥

आतां पहिली, "आ डिक्षनरि आव्ह धि मराठी लांग्वेज." म्हणजे मराठी भाषेचे शब्द कोशाचा हा ग्रंथ लेफटेनेंट् कर्नेल व्हान्स् किनडी यांणीं केला, तो मुंबई येथें सन १८२४ त छापला, त्याचे पहिल्या भागाचे ७०वे पृष्ठावर पाहा, असें लिहिलें आहे कीं, "परभू } परभू हें नाव प्रभु ज्यांचा साधारण धंदा लिहिण्याचा आहे, अशा लोकांची लो

" कोनींत्यांकरवीं धारणकर विलें आहे, आणि तेस्वतः , बा
" म्हण असें समजतात."

## ॥ समाधान ॥

यावर उघड समाधान असें आहे कीं, त्या डिक्सनरि कोशाचे, कर्त्यांच्या पाहाण्यांत, पत्तन प्रभू ची उत्पत्ती मुळी च आली नाहीं म्हणूनतसें त्याणीं लिहिलें आहे.

आतां सर्व संस्कृत शब्दकोशांत तर " पत्तन " आणि " प्रभु," हे दोन मूळचे शब्द आहेत, परंतु " पाताणये " आणि " परभू " असे नाहींत, याचें कारण इतकेंच कीं, त्यांचे अपभ्रंश झाले आहेत म्हणून, आतां राहिलेजे मराठी कोश, तेतर आज ५० वर्षांचे आली कडे आतांचे राज्यांत, शास्त्री पंडितांचे साह्यानें झाले आहे.

आतां यावर पाहा, " प्रभु " आणि " परभू " त्या दोन शब्दांत इतकाच भेद आहे कीं, " ब्राह्मण " आणि " बामण," असा फरक आहे, असाजाणावा; याप्रमाणें " पत्तन " आणि " पाताणये," या शब्दांत हीं तसाच भेद समजावा

॥ जॉर्ज ब्रो मोल्सवर्थ मराठी डिक्सनरि ॥
त्याचें नांव दुसरा, " आ डिक्सनरि मराठी आंन्ड इंग्लिश "

म्हणजे मराठी व इंग्लिशशब्दांचा हा कोश, ज्यापूर्वी जेम्स् टी मोल्सवर्थ यांणी मुंबईच्या राज्यांतील लोकां करितां शब्दसंग्रह करून रचिला, त्यास लेफटेनेंट टामस आणि जार्ज क्यांडी यांहीं साह्य करून तो मुंबई येथें सन १८३१ त छापला त्याचे ६०८ वे पृष्ठावर, "परभू" ह्या शब्दाचे अर्थी रशालीं," पानाप्या "याविषईं असें लिहिलें आहे कीं," ते आणि ब्राह्मण यामध्यें त्यांचे उत्पत्ती विषयीं "वकाचकांचे वादविवाद होतात त्यांचा कांहीं निर्णय त्यां "च्यानें होत नाहीं, व ही गोष्ट हांशिलाची नाहीं, म्हणून त्या "चाठराव केल्याशिवाय येथें सोडून द्यावी हें योग्य आहे."

त्याच डिक्षनरि कोशाची, दुसरी आवृत्ति, त्याचकोशकर्त्यांहीं, मुंबई मध्यें पुनः सन १८५७ त छापली, त्याचे १५८ वे पृष्ठावर असें लिहिलें आहे कीं, क्षत्रिय पुरुष व "त्याचीच स्त्री दुसरे दिवसाची रजस्वला असतां, तीशीं "रत होऊन जी उत्पत्ती झाली, तो "पाताण्या," असें जा "तिविवेक ग्रंथीं आहे"

पुनः सदरहू कोशाचे, व दुसऱ्या आवृत्तीच्या ४११ वे, पृष्ठावर असें लिहिलें आहे कीं,"परभू (परवाक्यापासून, "अथवा विपरीत जनन), अशीही एक ज्ञाती आहे व हे मा

"द्रि ग्रंथाप्रमाणें," पालाण्या" हा एक दासी पुत्राचाभे
"द असून, त्याची उत्पत्ती क्षत्रिय पुरुष, आणि शूद्र स्त्री,
"यांच्या संबंधानें झालेली आहे."

## ॥ यावर प्रथम समाधान ॥

याचें निःसंशयात्मक समाधान असें आहे कीं, याचका
रणामुळें मागें, वादविवाद होऊन, पुढें त्याचा शेवट झाला
तो मी यथें सविस्तर लिहितों, तो असा आहे कीं, त्याच" द्रि
माद्रि" आणि "जातिविवेक," त्या ग्रंथांवरून, तीं ... नवा
र वेळीं पत्तन प्रभूंचे उत्पत्ती विषयीं, वसई कर इ ... कल्यादि
ब्राह्मणांनीं, असें कपट केलें होतें, कारण कीं, पेशवे ...
सभेस एकदां अपयश मिळाला, परंतु तें त्यांचें ...
योग्य असें समजा, तें असें कीं, त्यांनीं त्या ग्रंथांत पत्त...
च्या उत्पत्ती विषयीं, नवीनच निंद्य, वचनांची कवित...
पद्यात्मक करून असा क्षेपक त्या ग्रंथांत घातली ह "प
सले ते ग्रंथ त्यांनीं सभेस दाखविले होते, त्या वेळीं ...
तें कपट लोकांच्या लक्षांत न आल्यामुळें, पुण्यांतील
ल लोकांची त्या ग्रंथावर फार प्रीति उत्पन्न होऊन, त्या
च्या बहुत मती आपल्याजवळ असाव्या, म्हणून ब्राह्म
णांनीं, पेशव्यांस विनंती केली, आणि आज्ञा झाल्यावर,

उनरून घेतल्या, इनका दुराग्रह वसईकर ब्राम्हणांस क रण्याचें कारण काय ? म्हणाल तर, मागें त्या पत्तन प्रभूवर, त्यांचे पूर्वजांनीं अर्थ वहिम घेतला होता; तो असाकीं, हेच प्रभू मागें म्लेंच्छ राज्यांच्यावेळीं, राजाची वेठ आपल्या वर आणीत होते, त्या योगानें वारंवार आपल्यास दुःख होत असे, तेहे प्रभूलोक आपल्यास द्‌ ल, असें ते समजत; परंतु दुसरें म्हटलें म्हणजे फिरंगीलोक स्वभस्यभोज्यांचीगांवोडीं या ब्राह्मणाच्या डोकीवर देत असत, असें होतें, याबर दुसरें लोभामुळें हूंघ उत्पन्न झालाहो असाकीं, या मुंबईतले एके पत्तन प्रभूनें एक गणपतीचें देवालय बांधलें, आणि श्री गणे शस्थापना करतेवेळीं, हे वसईकर इत्यादि ब्राह्मण असे म्ह णूलागलेकीं, "आमचा आचार्य मानआहे, आणि हें देवा "लय आमचे स्वाधीन असावें कारणकीं आम्हीं एथले स्था "ईक असून, सकल पुरोहित वृत्ती आमची आहे म्हणून."

परंतु ते त्या प्रभूनीं अमान्य केलें, आणि त्या कालींजे खेडव र राजगुरु होते, ते व त्यांचे दुसरे विद्वान् ब्राह्मण यांचे हस्तें गणेश अर्चा केली इत्यादि, हें मूल दूषोत्पत्तीचें कारण हो य, त्यावरतर अधिकोत्तर त्यांचा नवा द्वेष असा झालाकीं श के १६६१त त्याच गणपतीचे पूजं करीतां ब्राह्मण नेमला,

आणि त्यास कांहीं शेते व वाड्या दानकरून दिल्या, आणि त्याच वर्षी म्हणजे १६६१ त पेशव्यांहीं वसई घेतली असें, तें देवालय हाल्लीं श्री भुलेश्वराचे दक्षण दिशेस आहे, असें त्यांचें मनीं वैर पडल्यावर त्या ब्राह्मणांनीं असा प्रयत्न केला कीं, कांहीं तरी या प्रभूंस दुःख द्यावें म्हणून, बाळाजी बाजीराव पेशवे उर्फ नाना साहेब यांस विनंती केली, आणि खोटें सर्व विदित केलें, तें असें कीं, ज्यांस हे प्रभू माहीत नव्हते, त्यांनीं जातिच्या जबान्या घेऊन त्या दाखविल्या, आणि आज्ञापत्र त्या पेशव्यांनें घेतलें, आणि शंकराजी केशव सुभेदार प्रांत वसई यांजवर आणिलें, आणि त्या सुभेदारानें त्यावरून न्याय वसईस केला, व निवाड पत्र त्यानास लिहिलें, याजकरितां नानानेंच ऊळकर इत्यादि ज्ञाती याप्रभूंचे उपाध्यांस शके १६६५ त पत्र लिहिलें कीं, " याप्रभूंचे "घरीं लग्नकार्यांत " पूर्ववत प्रमाणें कर्म चालतूं नये." आणि तसे त्यांवेळीं तसशी ब्राम्हण जुलूम करूं लागले, त्या जुलुमाचा पुढें प्रळय इतका झाला कीं, या प्रभूंस तो सहन होईना, नंतर रामाजी महादेव सुभेदार प्रांत साष्टी यांस, उरणचे मुक्कामीं या प्रभूंहीं हा सर्व वाका विदित केला, त्या वरून त्यांची निशा झाली, आणि त्याणें प्रभूंचें निर्णयपत्र

पेशव्यांस शके १६७०त लिहिलें, व प्रभूचे पुरोहितांस सांगी
तलें कीं, स्वरस्वरूप प्रभूचीं पूर्ववत् प्रमाणें कार्य प्रयोजनें चा
लवावीं, त्यावरून तो त्रुल्कम थोडासा कमी झाला; याप्रमा
णें तीस, चाळीस वर्षे पर्यंत, पत्तन प्रभूंस मोठे श्रमानें वागा
वें लागलें, पुढें शके १७०९त श्री विद्याशंकरभारती शंकर
स्वामी, हे मुंबईस आले, आणि त्यांनीं पुण्यनगर प्रभृति
समस्त ब्राम्हण यांस मराठी भाषेंत आज्ञापत्र लिहिलें, तें
वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री धनःश्यामशास्त्री जड
ये यांनीं पुण्यांत, श्रीमंत सवाई माधवपेशवे ह्यांचे सहो
ते, त्यांस भरसभेंत दाखविलें, तें श्रीमंतानीं माहातांव अ
भिवंदन करून वाचिलें, आणि तत्क्षणीं त्या वसईकर
ब्राम्हणांस, आज्ञा केली कीं, "तुमचा सर्वमजकूर गैरशि
"स्त आहे, म्हणून तुम्हीं यास भेंतून आजजावें," असें बो
लून शास्त्री दादा यांस म्हणाले कीं, "श्रीशंकर स्वामींच्या
"या आज्ञा पत्रा प्रमाणें, पत्तन प्रभूंच्या पुरोहितांनीं, सर्वका
"र्ये प्रयोजनें, पूर्ववत्प्रमाणें, त्यांचे घरीं चालवावीं," असें
सांगून, त्यांनीं सभा विसर्जन केली, असें वृत्त सुखानें सांगू
न कोंगेले, म्हणाल तर, मतप्रवर्त्तक जगद्गुरू यांच्या पत्राव
र, कोणीं पत्र लिहूनये, अशी सनातन रीत आहे, ती ताहि

ली पाहिजे ह्मणून.

यानंतर दुसऱ्या दिवशीं, नाना फडणीस ऊर्फ बाळाजी जनार्दन भाऊ, यांनीं, स्वगृहीं एकांत स्थानीं ( ह्मणजे खलबतखान्यांत ) त्या घनःश्यामशास्त्री दादांस, आणि रामशास्त्री माहुलीकर यांस, बोलावून चौकशी केली, ती याप्रमाणें

" रामशास्त्री बावा, कालच्या सभेंत, पेशव्यांनीं श्री शंकर
"स्वामींचें पत्र वंदन करून वाचिलें, आणि वसईकर, पाताणे परभू
" वेवादी, यांस फांटा दिला, ही गोष्ट सत्कृत्य केली काय ?"

यावरनें, रामशास्त्री ह्मणाले कीं, "पत्तन प्रभू हे पूर्वींच्या
"रूढीप्रमाणें द्वितीय वर्णाश्रमधर्म आचरतात, या पासून
"आपल्यास हरकत काय आहे ? एवढे वसईकर ब्राम्हण या
" च्या भागाच्या वैरामुळें, असा अशास्त्र दुराग्रह ते करितात,
" तो आपण जमेस धरावा, हें कांहीं आपल्यास उचित नाहीं, याव
"र आपले रामाजी महादेव सुभेदार यांनीं साक्षी, यांचें उघड
" निर्णयपत्र शके १६७० चें आहे कीं, पत्तन प्रभूंची कर्मकांडीं
" वहिवाट सनातन आहे, आणि ते शुद्ध क्षत्रिय आहेत; हा वि
"षय निःपक्षपातें पाहिल्यानंतर, श्री जगद्गुरूंनीं मनास आणावा
"आणि आपला अधिकार नव्हे, त्यावरतें सबल पुराण संमति
" पत्रें लिहितात."

त्यानंतर शास्त्री दादाजडये बोललेकीं, "आपले को
"ल्हापुरकर, श्री शंकर स्वामींनीं शके १७०१ त, पत्तनप्रभूं
"स, स्कंदपुराणांतर्गत सह्याद्रिखंड हा ग्रंथ, आपल्यास्वम
"ठांतून, पाठवूनदिला, व त्याच्या आधारानेंच सम्मतिपत्र करू
"नदिलें आहे, आणितो ग्रंथ मी हाल्लींचमुंबईसपाहिला, त्यांत
"आपल्या सर्व ब्राह्मणांचे, पत्तनप्रभूंचे, आणि शूद्रादिवर्णां
"चे विचार, व उत्पत्तीचे प्रकार, हे सविस्तर सांगितले आहेत."

आणखी: "हा सर्व बोभाटा, आज चाळीस वर्षेपर्यंत, पत्तनप्र
"भू श्री शंकर स्वामीस लिहित आले आहेत, तशांत त्याप्रभूंच्या
"मोठ्यादैवानें यासाठीं, ते स्वामी स्वदेशीं संचार करीत करीत, प्र
"तापासानें मुंबईस आले होते, तेव्हां त्यांपाशीं मी इतके ग्रंथ पाहि
"ले, एक जातिविवेक, २ बृहज्जातिविवेक आणि ३ हेमाद्रि;
"हे सुमारें ३०० वर्षांचे आंत बाहेर झालेले, आणि लिहिलेले, अ
"सावेत, त्यांत आपले सर्व हिंदूउत्पत्तीविषयीं प्रतिलोम, अनुलोम यां
"चें सविस्तर लिहिलें आहे, परंतु पत्तनप्रभूंचा निर्णय त्यांत नाहीं;
"आणखीं मजपाशीं इतके ग्रंथ आहेत, एक शतप्रश्नकल्पलता,
"किंवा निलाचमाधवकल्पलता असें म्हणतात, २ जातिचिंताम
"णीं, ३ जातिसारमंजरी, आणि ४ परशुरामप्रताप; परं
"तु हे सर्व नवे ग्रंथ केलेले आहेत, असेच दुसरे कित्येक, मुंबई

* केरळदेशीं

"कर सभ्य गृहस्थ, आणि शिष्ट ब्राह्मण, शास्त्री, व प्रभूंचे पुरोहि
"त, यांचे घरीं ग्रंथ आहेत, एक जातिदर्पण, २ गागाभट्टी आणि ३ स्मृत्य
"र्थसार, हे मी सर्व मिळून दहा ग्रंथ पाहिले."

इतकें भाषण झाल्यावर, नाना उठून बाहेर आले, आणि ते दोनीही शास्त्री आपल्या घरीं निघून गेले, त्यानंतर कित्येक दिवशीं, ते शास्त्री दादा मुंबईस आले, व त्यांनीं प्रभूंच्या सर्व पुरोहितां समक्ष, प्रभूंस हा सर्व वृत्तांत श्रुत केला.

याज करितां ते वर लिहिलेले दश ग्रंथांतून कांहीं मी ग्रंथ एकत्र करून पाहिले, आणि हाल्लीं मज पासीं त्यांतून सा, सात ग्रंथ आहेत.

यापुढें त्या दिवसापासून, पत्तन प्रभूंचे वादाचा शेवट च झाला, आणि पूर्वीं प्रमाणें प्रभूंचीं कार्य प्रयोजनें, उघड रीतीनें, पेशव्यां चे वेळीं चालू झालीं, परंतु ही सर्व बातमी, त्या सवाई माधवराव पेशव्यास, समजतांच, त्यांनीं त्याच वेळीं, आपल्या राष्ट्रांत, जितके ज्ञातिच्या उत्पत्ती विषयींचे, नंतर उपस्थित होणारे, असे संस्कृत खोटे ग्रंथ, सांपडतील, तितके नेऊन, गंगेत बुडवावे, म्हणून आज्ञा केली, त्या योगानें, पेशव्यांवर, असा अपशब्द आला कीं, "त्यांनीं श्री सह्याद्रिखंड हा ग्रंथ बुडविला"

॥ यावर द्वितीय समाधान ॥

आतां पुनः येथें मी उघड समाधान लिहितों तें असे आहे कीं, त्यांनीं कित्येक नवे खोटे क्षेपक ग्रंथ उत्पन्न करून लोकांनीं लपवून, आपल्या संग्र

होंठेविलेहोते, खोटेक्षेपक असेंम्हणण्याचें कारण, त्यांतत्यावसईकर ब्राम्हणलोकांनींआ र्दत अदलाबदलफारचनछपत अशीकेली आहेत तेग्रंथ; एकजातिविवेक, आणिदुसरा हेमाद्रि असेहोत. त्याग्रंथांच्या मतीं; "मोलस्वर्थडिक्शनरि" या कोशकरण्याचेवेळेस, शास्त्रीपंडितजे, तोकोशकरण्याकरितां, नेमले होते, त्यांजवळत्या होत्या, त्याचत्यांनीं दाखविल्या, ते क्षेपककांहींजगवंद्यहोणारनाहीत, यास्तवत्या ग्रंथांवरून, पत्तनप्रभूंच्याउत्पत्तीविषयीं; निर्णयत्याडिक्शनरि कोशांत, लिहिला आहे, त्याप्रमाणें याजगांत, तो प्रमाण मून, किंवा मान्य असाहोणार कोठून.

आतांज्यांनीं, ते ग्रंथलपवून ठेविले होते, त्यांचेमनांतला हेतुहा चहोता कीं, आगें मागें, या ग्रंथांवरून, कांहींतरीहाविषयउपस्थित होईल, तेव्हां आपलें कार्य साधेल, तो आजवेळ किंवाप्रसंग, या डिक्शनरिमार्गेकादपयास, त्यांससांपडला, म्हणून कांहीं चिंता नाहीं, ज्ञाते, व न्यायानें निःपक्षपाहणारे; यांसतो मान्यहोणार नव्हे, असेरीतिने, जसी वडाचीसालआहे, तीचपिंपळाची असें म्हणावेलकाय? यासप्रमाणेंपाहिजेत, अथवा मीयेथेंलिहितों तीपाहा, वाघ, वारांगना, आणि दासी यांचेवंशयाजगांत रहिंगतहोतीलकाय? आणिसहस्त्रावधिस्त्रिया आणि पुरुष, हेत्यांचे वंशाजआपण असेंम्हणवितीलकाय? असेंयाजगांतकसेंसं

भवेल, हीगोष्ट असंभवित आहे, याहा मागें याहिंदुस्थानांत बहुनरश्रे जे होऊन गेले, त्यांजपासीं शतानुशत दासदासी होत्या, त्यांतले कोठले राजाचे, दासीचा कोणता वंश, त्याची ही एक ज्ञातजमून, सहस्त्ररूप झाले आहेत, जसे एकदांच साठ सहस्त्र, वालखिल्य उत्पन्न झाले नव्हत, अशी कथा "आर्ष" ग्रंथीं कोठें तरी लिहिली आहे, व त्यावर जगद्गुरू, श्री शंकरस्वामी चीसंमति, आणि तसीच हिवाद चालली आहे, किंवा एका घावनंतर सहस्त्र वाघ आहेत, अशी गोष्ट कोणाचे कानीं तरी सांगण्यांत आजपर्यंत आली आहे काय? अथवा मागें सहस्त्रावधी वारांगना ज्या एखाद्या नगरांत सहस्त्रपुत्र पौत्रांची ही एक अमुकनावें ज्ञाति उत्पन्न झाली आहे, अशी कोणाचे स्वप्नांत तरी ही वार्ता आली आहे काय? असो.

आज सालशें ७०० वर्षांचे आंतच मात्र तसें झालें, व सर्व क्षत्रिय धर्मपत्न्यांचा लोप होऊन दासीस्त्रियांशीं क्षत्रिय रत झाले हें कसें म्हणावें, यावर प्रत्यक्ष प्रमाण पाहा, असे जें आज ५०० पांचशें वर्षांवर हे पत्तनप्रभू कोंकणांत आले, आणि त्यांतले कित्येकांनी तर आजदिनपर्यंत परंपरेनें दासी बाळगल्या होत्या, त्यांचें तसेंनें उत्पन्न झालेलें संतान जर निवडून पाहूं गेल्यास वीस अथवा तीस पुरुष पुरे भरणार नाहींत, तर मग पन्नास, साठ, अथवा शत, कोठून हजार तर स्वप्नांत माहीत नाहीं, हा अनुभव

त्यास व्हावा, त्याणें त्यांस मोजून पाहावें, अणखी हे पतन प्रभू दासीपुत्रा पासून उत्पन्न झाले, असा अभद्र डाग त्यांचे शत्रू उत्पतीस लागला, तो धुवून काढावा, म्हणून मी असें लिहितों, असें कांहींकोणी तरी तुम्ही समजूं नका, तर या वर कोणी एकवेळा न्याय करून पाहा, असे कोट्यान कोटी असत्य वादी शत्रु पुढें ऊभे राहून हावाद सांगतील, तरते सर्व हारतील, आणि त्यायापुढें खच्याचें खरें होईल, यास प्रमाण पाहा, काच आणि पाच एकच मोल पावेल काय? किंवा खद्योत आणि सूर्यप्रकाश एकसारखा च पडेल काय? नाहीं, सूर्यतो सूर्य, आणि खद्योततो खद्योत, अथवा माती पाषाण, आणि सोनें हें सारखें त्यांचे वजनांस व मोलास कसें पावेल, नाहींनाहीं. आतां त्याचे पूर्वीतर हिंदूंचें करडी तपणें राज्य चालत असे; असो.

आतां यावर लिहिलेले, असले सहस्त्रावधि, रद्द झालेले ग्रंथ, दाखविले म्हणून, त्यांचीं प्रमाणें या जगांत पंद्य होतील काय? न व्हे होनव्हे! असें न्याय दृष्टीनें उघड दिसत आहे, तें असें कीं हर एक शब्द कोशांत तर इतकेंच दिसून यावें कीं, "प्रभु" ही एक हिंदू ज्ञातींतली ज्ञात आहे, असें असावें, तें न लिहून त्याचा वास्तविक शोध, व उत्पत्ती निर्णय न पाहातां, "पाताणे प्रभू" चे म्हणजे "पतन प्रभू" च्या, उत्पत्ती विषयीं उलट लिहिणें, हें प्रशस्त नाहीं, सा

क्षेपानें वाईट, खोटें, व निंद्य, असा निर्णय प्रभूचे उत्पत्ती बाद
स्रवणें हें सर्वांस मान्य होईल काय ? एक (१), शब्दकोशांतनर
जातिविवेक ग्रंथा सारखें विवेचन करण्याचें काम नव्हे, हे अयो
ग्य, दोन (२), आणि कोठले "आर्ष" ग्रंथीं असा उघड सिद्धां
त लिहिला आहे कीं, "प्रभु" नव्हे परंतु "परभू" शब्द म्हणावा,
आणि त्याचा विपरीत अर्थ असा करावा कीं, "पर वीर्योत्पन्न
पानापो परभू" म्हणावे म्हणजे अन्यजातीचें वीर्य दुसऱ्या ज्ञा
तीच्या स्त्रियेस देऊन उत्पन्न झालेले असें पंडितां — स लिहि
णें, हे अनुचीत — (३), त्याचप्रमाणें स्वस्त्री दुसऱ्या दिवसा
ची ऋतुस्नात असतां, तीस संग केला म्हणून लिहिलें, त्याविष
यीं हिंदु शास्त्रांत सुद्धांच असें सांगितलें नाहीं, उलटें तिला
स्पर्श करूं नये असें आहे, त्यास चार दिवस झालेच पाहिजेत,
ही शास्त्रमर्यादा उल्लंघून गलनसें लिहिलें, हा गौणपक्ष नव्हे
काय ? असा कोण पापिष्ट आहे कीं, असें अशास्त्रनीच कर्म क
रील, हें अभद्र चार (४), असले स्वप्न पांडित्य निर्णय काय उ
पयोगाचे, यास कोणीहि मानीत नाहीं, आणि पुसत ही नाहीं त
का कीं, हे काय प्रमाणिक आहेत म्हणून यांस मानावें, याचें कार
ण असें आहे कीं, जातिविवेक ग्रंथीं एक प्रकारचे, आणि हे मा
हि ग्रंथांत दुसरें प्रकारचे, असें एकटे "पानापो परभू" विषयीं,

कथनलिहिलेंआहे, याचेंचनाव "पौरुषेय" ग्रंथम्मणतात, याचें तात्पर्य इतकेंचकीं, "पत्तनप्रभु" चाशुराशोध त्यांसलागलानाहीं, तो कसा म्हणालतर असाकीं, गोजातिविवेकाचा कर्ताकायघरि कायंत्र ( म्हणजेघड्याळ ) हातीं घेऊन रजस्वलाक्षत्रियस्त्रि यांचे दिवसकिति झालेम्हणून, त्यांस, असे मोजीत बसलाहोता, जसेंमागें श्रीभास्कराचार्य सृष्टिगणित करीत होतेबहून्, आणि तसेंच हे भाद्रि ग्रंथकर्त्यानें स्वतः पाहिलें असेल, अथवा, "आर्ष" ग्रंथीं असें कथन पाहिलें असेलकीं, सर्वक्षत्रियस्त्रि या वांझा झाल्या, आणित्यांच्या हजारो दासी पुत्रवति झाल्या होत्या, म्हणून हें संभवेलकीं काय ? नाहिंहोनाहीं.

आतां यावरमी या पत्तनप्रभू विषयीं, जें कायत्यांचे सनातन आहेतें लिहितों, तें पाहा कसें, त्यांचे आधार श्रीजगद्गुरूचें संमति पत्रांत, आणि त्यांत "आर्ष" ग्रंथाचे सबलप्रमाण, लिहिलें आहे, आणि त्यांचीतसी वहिवाट अद्यापिचालती आहे, यावरून हावाद मागेंच सवाईमाधवरावपेशवे यांनीं तोडिला, पुनरपि असाच वाद लागलाहोता, तोत्याणेंच तोडिलातोप्रकार असा.

॥ यावरत्रितयसमाधान ॥

यास प्रत्यक्षसमाधान असें आहेकीं, शके १७१७ ततारीख १५ वी आगष्ट सन् १७९५ सालचा ... धिंबंबेकुरीअर" नामक

इंग्लिश वर्तमान पत्रांत असें छापलें आहे कीं, "पुणें येथें ब्रा
"ह्मण व प्रभू अथवा ज्यांस इंग्लिश लोक "परव" असें ह्मणता
"त, यांमध्यें कांहीं काळ एक विलक्षण वाद चालू झाला. तो अ
"सा कीं, ब्राह्मण लोक असा आरोप घेतात कीं; ह्या सर्व लोकां
"नीं आमच्या श्रेष्ठ हक्कावर हळु हळु एक भयंकर घाला घात
"ला, तो असा कीं, आम्हां ब्राह्मणांचें यज्ञोपवीत यांणीं धार
"ण केलें, ब्राह्मणांच्या लेखण्याच्या रीति त्यांनीं घेतल्या, आ
"णि आम्हांमध्यें एकदां स्त्रिया यांचे भ्रतार वारले, ह्मणजे त्यांणीं
"निरंतर वैधव्य दुःखाचा उपभोग घ्यावा, अशा हक्काविषयीं आ
"ह्मीं कितीं मानीत होतों, तसें आम्हां श्रेष्ठ लोकांप्रमाणें हे ही
"वागूं लागले, परंतु इकडे, "परव" लोक पाहावे तो ह्या हक्काचे व
"हीं कमी आग्रही आहेत असें नाहीं, ते असी तकरार करितात
"कीं, पूर्वापार शास्त्राच्या आधारावरून आमचा हक्क व
"चन आहे, मग अशा ह्या शिष्टाचाराच्या विषयांवरून, मत्स
"र द्वेष उत्पन्न होऊन त्याचें माहात्म्य इतकें वाढलें कीं,
"श्रेष्ठी पेशवे (ह्मणजे श्रीमंत माधवराव) यांस मध्यस्थी
"करणें लागलें, आणि त्यास योग्य अशा यांच्या गंभीर विचा
"रानें त्यांणीं ह्या वादाचा वास्तविक निवाडा केला, कीं तेहे म
"नखून", असी त्याचा [illegible] पूर्ण खातरी झाली आहे, कशाव

न ह्मणालनर पाहा, रामजी महादेव सुभेदार यांचें एक निवाडाप त्र, श्रीविद्याशंकरस्वामीचें आज्ञापत्र दोन, श्रीमद्विद्यानृसिंह भारती करवीरकर यांचें निर्णयपत्र तीन, आणि सुरतेचे २९ गुर्जर ब्राह्मण यांचें संमतिपत्र चार, यांवरून असें कीं हे पत्तन प्रभू भिन्न आहेत, आणि यांची सनातन वहिवाट चालली आहे.

आतां हा वरलाजो, वेंकुरीअरीनवाद् त्यागें प्रसिद्ध झाला आहे, तो आतां सन १८६३ त. म्हणजे शके १७८४ चे, एक "प्रभूयेसे" म्हणजे निबंध इंग्लिश भाषेंत छापला आहे, त्यांत तो पाहा लिहिला आहे.

अद्यापि जे कोणी पत्तनप्रभूंस न जाणणारे असे ब्राह्मण, आणि आपली उत्पत्ती माहीत नाहीं असा एखादा पत्तनप्रभु, हे एकत्र झाले, म्हणजे असले खोटे वाद उत्पन्न होतात, त्यांचा पुढें श्रीजगद्गुरु वैदिक हे, असा निर्णय करितात कीं, त्यापासून उभयतांचें समाधान होतें, तें असें कीं, या प्रभूंचा सनातन अधिकार कसा आहे, तो त्यांच्या स्पष्ट ध्यानांत येतो, त्यावरून तो सर्व वाद मिटून जातो, यावर उदाहरण पाहा, जशी एकवीस वेळा, निःक्षत्रिय पृथ्वी श्रीपरशुरामानें केली, हें खरें, परंतु पुढें भीष्मपितामह हा क्षत्रिय झाला, त्यासवें युद्धांत, त्या रामजीची क्षांतभंग झाली. तस्मात् क्ष

त्रियांचा, अक्षय वंश अद्यापि चालतो आहे. तो असाकीं, श्री भृगुऋषी चा उशापत्यांस आहे.

पुनः त्याच वर्षी म्हणजे शके १७१७ त नेकनामदार गव र्नर जनाथान् डंकन् हे मुंबईचे गवर्नर झाले, आणि त्यांनीं पत्तनप्रभूंचे उत्पत्ती विषयींची हकिकत त्यांपासीं मागित ली, तेव्हां प्रभूनीं पेशव्यां बरावर वादप्रतिवाद होऊन सि द्धांत झालेली, अशी जि वर लिहिलेली सर्व हकिकत, तिचा तर्जुमा इंग्लिश भाषेंत लिहून दिला आणि आतांत च हकि कत मराठी भाषेंत शके १७८८ चे "धि प्रभु क्यालेन्डर," म्ह णजे पंच्यागन्यांत प्रसिद्ध केली आहे.

आतां हे वरले, सर्व पत्तनप्रभूंचे शोध, त्या "माल सु वर्थ डिक्सनरि" याचे कर्त्यास, आणि त्यांचे साह्यकर्त्यांस, हाल्लीं सांपडलेले शोध त्यांस लागलेले असते, तरसा झी पूर्ण खातरी आहे कीं, कधींहो त्या डिक्सनरीत तसें ते लि हिते ना.

॥ एच. एच. उल्सनस ग्लोसरी ॥

आतां चवथी, "आग्लोसरी," म्हणजे निवडक शब्दांचा हा कोश, तो एच. एच. उल्सन यांणीं इंग्लिश भाषेंत केला, तो सन् १८५५ त लंडन येथें छापला, त्याचे ४०२ रे पृष्ठावर

[stamp]

तर असें लिहिलें आहे कीं, "प्रभु-परभू - त्याचा सा... अ... पभ्रंश होऊन "परव" म्हणतात; त्यांची उत्पत्ती नीचापासून आहे, यास्तव जे खरे शूद्र आहेत, त्यांपेक्षांने नीच होत, असें ब्राम्हणलोक समजतात, त्यांचे तीन वर्ग आहेत, ते असेकीं, चंद्रशेनीप्रभू हे मुख्यत्वें करून पुण्यास, पाताणे हे मुंबई व सुरत येथें, आणि धवनी हे गोवें येथें असतात.

॥ समाधान ॥

यावर स्पष्टसमाधान असें आहे कीं, पत्तनप्रभूंची उत्पत्ती तर "आर्ष" ग्रंथीं श्री स्कंधपुराणीं प्रसिद्धपणें सांगितली आहे, ती अशी कीं, "अश्वपति व कामपति" ह्या राजांपासून- "झाली आहे," हे प्रभू चंद्रशेनी म्हणवीत नाहींत, हा निर्णयमागेंच श्रीजगद्गुरू कोल्हापुरकर शंकर स्वामींनीं शके १७१० त पुनः संस्कृत संमति सह वर्तमान पत्र करवून सुरतेस उघड केला, अणखी त्याच दिवशी सुरतेचे २९ सशिष्ट गुर्जर ब्राह्मणांनीं तशाच मजकुराचें संस्कृत भाषेंत संमति पत्र केलें, तीं पत्रें "पत्तनप्रभुलेख्यमणि" या ग्रंथीं प्रसिद्ध केलीं आहेत, तीं पाहावीं, तीं चतुरविद्वज्जन ब्राम्हण आदिकरून, सर्वांस मान्य आहेत, अथवा तसेंच "धिप्रभु क्यालेन्डर" म्हणजे प्रभु पंचांग शके १७.. ... इंग्लिश भाषेंत प्रसिद्ध

झालें आहे, त्याचे ३८ वे पृष्ठावर मराठी भाषेंत लिहिलें आहे तें पाहा, हा निर्णय त्या "ग्लोसरी" चे कर्त्यास माहीत नाहीं म्हणून त्यानें तसें लिहिलें.

आणखी त्यानंतर शके १७४७ त लोम, अनुलोम, आणि प्रतिलोम हिंदू ज्ञाति मार्गेपासून झाल्या आहेत, त्याची फारच चौकशी होऊन एक मराठी भाषेंत "पट" वर लिहिलेल्या दश ग्रंथाधारें बहुत शास्त्री पंडितांच्या संमतें केला आहे, त्यांत पत्तनप्रभूंचे उत्पत्तीचा निर्णय केलाच नाहीं, कारण कीं, ते प्रभू लोम, अनुलोम असे सुद्धां नाहींत.

आणखी त्याच सालीं, म्हणजे शके १७४७ त एक इंग्लिश भाषेंत "समरी आव्ह धिला," म्हणजे धर्म संक्षेपक हा ग्रंथ, आर्थरस्टील, यांणीं मुंबईंत सन १८२७ त राजाज्ञेवरून बहुत शास्त्री पंडित, यांच्या साह्यानें केला, आणि छापला, त्याचे १०० वे पृष्ठावर पाहा असें लिहिलें आहे कीं, "आणखीं दोन ज्ञातीचे लोक पुण्यांत नाहींत, एक "पत्तनप्रभु" आणि दुसरे "धवनी" हे गोव्यांस आहेत, पत्तन "प्रभु हे मुंबई, सुरत, आणि चऊलास राहातात; हे उपरांत "पैठणचे राहाणार, यांस भृगुऋषीचा शाप झाला, त्यांस "तीन कर्मांचा अधिकार [illegible] हे सूर्यवंशी क्षत्रिय राजापा





सून झालेले आहेत," असे हे पुनः शके १७८४ चे वरलिहीले ले, प्रभुनिबंधांतः प्रसिद्ध केले आहे.

॥ आज्ञापत्र ॥

आतां आज्ञापत्र म्हणजे निर्णयपत्र, जेव्हां श्री शंकर स्वामींनीं पुण्यनगर प्रभृति आदिकरून सर्वत्र ठिकाणचे ब्राह्मण यांस मराठी भाषेंत लिहिलें, आणि समस्त पत्तनप्रभु ज्ञाति गृहस्थ जे या मुंबईच्या सभेंत त्यावेळीं आले होते, त्यांस उपदेशपर भाषण करून सांगितलें तें असें कीं, "ऐका हो प्रभुमंडळी तुमचें केवळ सुखावलोकन करून, हें मी आज्ञापत्र लिहितों, असें तुम्ही समजूं नका, कारण कीं तुमची उत्पत्ती श्रीव्यासानें स्कंधपुराणीं सह्याद्रि खंडीं भविष्यनिरूपणानें कथिली आहे, ती मी पाहिली, अणखी या हिंदुस्थानांत भिन्न भिन्न नावानें क्षत्रिय ज्ञातीचे बहुत आहेत, परंतु तुमचे एके ज्ञातीस तर "पाताणे प्रभु" म्हणजे "पत्तनप्रभु" असें नाम म्हणतात, अणखी तुमचे सांप्रतकाळीं या कोंकण देशीं वास्तव्य आहे, जसें त्या ग्रंथीं व्यासांनीं लिहिलें आहे, त्या प्रमाणें सर्व तुमच्या ज्ञातीचे नावासारखा तो भविष्यवाद आहे, अणखी तुम्हीं सर्व श्रीमत् भगवद्गीतेंत आणि धर्मशास्त्रांत जसा क्षत्रिय धर्म मार्ग सं[illegible]तला आहे, तदनुसार

"तुमचीचाल,रीत अद्यापिचालतआहे, तीअशीकीं देव, दे
"वार्चन, आचार, स्नान, संध्या, दान, धर्म, दया, गाई,
"ब्राम्हणसेवन, आणि ईश्वरभाव, भक्ति इत्यादिजे करित
"तें सर्व यथार्थ आहे, आणि प्राचीन शिष्ट ब्राम्हणतुमचे घरी
"यथायोग्य कार्य प्रयोजनें चालवितात, आणि त्यांनीं जे नि
"य तुमचे ज्ञाति विषयीं मागें केले आहेत, तेही मी पाहिले,
"गिचमी आपलें मत स्थापित करितों, असें तुम्हीं समजूंनये,
"याजकरितां तुम्हीं क्षत्रिय आहां, अणखी आज तुमच
"त कित्येक न्याय, मीमांसा पर्यंत संस्कृत ग्रंथाचे ज्ञाते
"हेत, आणि कित्येकांची व्युत्पत्ति व कविता शक्ति जशी चां
"ली संस्कृतांत असावी तशी असून मराठी भाषेंत ही चां
"ले निष्णांत आहेत, याजकरितां तुम्हीं सद्भावानें तो सन
"तन धर्म आचरतां आणि तसा चालत आला, त्या मार्गा
"पुढें चाला." असें बोलून त्यांनीं तें पत्र तसें लिहून याम
च्या हातीं दिलें, आणि ते स्वामि स्वमठा सगेले, तें पत्र "पत
तमधुलेरत्नमणि" या ग्रंथीं प्रसिद्ध केलें आहे.

॥विज्ञप्ति॥

आतां आपले सर्व गृहस्थ मंडळीयांस माझी विनय
र्वक विज्ञप्ति अशी आ..., वर लिहिल्याप्रमाणें आपले